MUKUND R. ODHEKAR
Regd. No.
2000
ADVOCATE


# मुकूंद रामचंद्र ओढेकर

बी.कॉम एलएल.बी. ॲडव्होकेट,
सर्व्हे नंबर 575, प्लॉट क्रमांक 3 शिवदुर्गा बंगलो,डॉ.होमी
भाभानगर,नाशिक-11 मोबाईल नंबर 9325668069


---

दिनांक 02/11/2019

## टायटल रिपोर्ट

प्रति,
मे. शिवालीक रिअल्टी तर्फे भागीदार
श्री.मधुभाई बाबुभाई कोठीया व इतर
रा. नासिक

महोदय,

मिळकतीचे वर्णन- तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालूका नाशिक पैकी नाशिक महानगरपालीका हद्दीतील, रहिवाशी विभागात समाविष्ट असलेली मौजे अंबड खुर्द गट नंबर 299/3/1 पैकी प्लॉट नंबर क्रमांक 01 यांसी एकूण क्षेत्र 4900.00 चौ.मी. यांसी बिनशेती आकार रूपये 6909.00 पैसे यांसी चतु:सिमा

पुर्वेस - 18 मिटर डी.पी. रोड
पश्चिमेस - नाला
दक्षिणेस - ले-आऊट मधील ओपन स्पेस, एमएसइडीसीएल+एसटीपी साठी राखीव क्षेत्र व प्लॉट क्रमांक 2 ची मिळकत
उत्तरेस -गट नंबर 299/3/1 पैकी प्राथमिक शाळेसाठी राखीव क्षेत्र

येणेप्रमाणे जलतरू, काष्टपाषाण, निधिनिक्षेप तदंगभुत वस्तुंसह तसेच कॉलनीरोडस् व ले-आऊटमधील सामाईक सुविधा वापरण्याचे हक्कासह चतु:सिमेतील दरोबस्त बिनशेती भुखंडाची मिळकत

मे.शिवालीक रिअल्टी तर्फे भागीदार श्री. मधुभाई बाबुभाई कोठीया व इतर यांनी खाली नमूद केलेल्या कागदपत्रानुसार टायटल देत आहे.

Regd.No.



1.7/12 उतारे, 2. 6-ड च्या नोंदी 3.बिनशेती परवानगी 4. ले-आऊट मंजूरीचे पत्र 5. ले-आऊट प्रत 6.खरेदीखत व नोंदणी पावती

नोंद क्रमांक 112 दिनांक ----25 भिका राजाराम मोरे व गोपाळा राजाराम मोरे यांनी दिनांक 13/4/25 रोजी रूपये 400 यांस सिताराम व्यंकटेश खेडकर यांस नजर गहाण दिले.

नोंद क्रमांक 169 दिनांक 10/7/30 नजरगहाण घेणार सिताराम व्यंकटेश खेडकर यांनी भिका व गोपाळा राजाराम मोरे यांना 400 रूपये दिनांक 12/6/30 रोजी देवून नजरगहाण घेतले मु.व 3 नोंद विहीर व पाणी यासह.

नोंद क्रमांक 275 दिनांक 10/5/40 भिका लक्ष्मण मोरे हे दिनाक 19/2/40 रोजी मयत झाले त्यास वारस मुलगा,मुलगी नाही फक्त बायको ममताबाई मर्द भिका ही आहे वारस रजिष्टरप्रमाणे नोंद केली असे.

नोंद क्रमांक 315 दिनांक 17/7/43 काशिनाथ बळवंत करमरकर यांनी सदर नंबर काशिनाथ, गोपाळ स्वतः व महादू व शंकर, गोपाळ फडोळ यांचे पा.क. म्हणून सईबाई मर्द गोपाळ फडोळ यांचेपासुन रूपये 300/-यांस दिनांक 18/5/43 रोजी नजरगहाण घेतले मु.व.3 नों. शिवाय दोन आंब्याचे झाडे स्वंतत्र व एक सामाईक आणि सखाराम कान्हूचे जमिनीतील विहीरीचे पाणी पाळीप्रमाणे.

नोंद क्रमांक 356 दिनांक 2/1/46 रोजी ममताबाई मर्द भिका मोरे ही दिनांक 2/1/46 रोजी गांवी मयत झाली असून मुलगी ठकुबाई मर्द शिवराम व पुतण्या महादू गुणाजी मोरे हे आहेत परंतू सदर जमिन महादू गुणाजी मोरे यांचेच प्रत्यक्ष कबजात असल्याने प्रत्यक्ष कबजा प्रमाणे मयताचे जागी वारस म्हणून नांव दाखल केले असे वारस रजिष्टरवरून सामाईक कबजेदार कायम असे.

नोंद क्रमांक 605 दिनांक 4/10/56 भागुजी महादू दातीर नंबरास कुळ कायदा कलम 2अ प्रमाणे लक्ष्मण मांडे यांचे नांव सन 53/54 चे सर्व साधारण कुळ म्हणून इतर हक्कांत केले.

नोंद क्रमांक 665 दिनांक 24/9/57 बाजूस दाखल केलेल्या नंबरास नजरगहाणदार मुदत वर्षे 5 चे म्हणून नामदेव

MUKUND R. ODHEKAR
Regd.No. MAH 1467 1970
ADVOCATE



धोंडूशेठ सोनार यांचे नांव इतर हक्कांत दाखल आहे परंतू गहाणाची फेड झाली असून गहाण 12 वर्षाचेवर झाले असल्याने इतर हक्कांतील नामदेव धोंडू शेटे यांचे पोकळीस्त नांव कमी केले.

नोंद क्रमांक 685 दिनांक 29/9/57 रोजी मे. कन्सालिडेशन ऑफीस भाग नासिक यांचे जमिन एकत्रिकरण पुर्ण होवून नविन ब्लॉक नंबर जमिन एकत्रिकरण योजनेप्रमाणे नोंद करावी मे.मामलेदार साहेब नासिक यांचे हुकूम क्रमांक - ------------नोंद पुसट असल्यामुळे दिसून येत नाही.

नोंद क्रमांक 715 दिनांक 26/6/59 बाजूस दाखल केलेल्या जमिनीत इतर हक्कांत रूंजा गबा दातीर यांचे नांव सर्व साधारण कुळ म्हणून दाखल आहे परंतू त्यांचा सन 57/58 व 58/59 या दोन वर्षात सदरच्या जमिनीत प्रत्यक्ष कबजा नसल्याने इतर हक्कांतील नांवे कमी केलेत.

नोंद क्रमांक 729 दिनांक 28/5/60 रोजी बाजूस दाखल केलेल्या जमिनीवर नासिकरोड देवळाली मल्टीपरपज सोसायटी लिमिटेड याचा बोजा आहे परंतू सोसायटीने सदरचे इकरार पत्रक रद्द केले आहे सबब इतर हक्कांतील नांव कमी केले सोसायटी कडील दिनांक 28/5/60 चे हुकूमावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 735 दिनांक 25/9/60 रोजी वारसाने महादू गुणाजी मोरे हे गांवी दिनांक 10/8/1960 रोजी मयत झाले मयतास वारस खालीलप्रमाणे आहेत.

| वारसांची नांवे | | मयताशी नाते |
|---|---|---|
| 1 नाना महादू | वय-36 | मुलगा |
| 2.दत्तु महादू | वय-26 | मुलगा |
| 3.काशिबाई मर्द गोविंद खांडबहाले | वय-30 | मुलगी |

वरीलप्रमाणे मयतास वारस मुलगे -2 एक मुलगी असे वारस असल्याने वारसांची नांवे दाखल केलेत.

नोंद क्रमांक 758 दिनांक -/3/1962 हुकूमावरून सदरचे गांव वर्ग-2 चे असल्याने ते मुंबई जात करणारा कायदा 1952

MUKUND R. ODHEKAR
Regd.No. MAH/1467/2000
ADVOCATE



प्रमाणे तारीख पासुन खालसा झालेले आहेत बाजूस वर्णन केलेल्या जमिनी नोंद पुसट असल्यामुळे दिसून येत नाहीत.

नोंद क्रमांक 800 दिनांक 26/5/1963 रोजी वारसाने खातेदार भिका सखाराम मोरे हे दिनांक 2/4/63 रोजी गावीच मयत झाल्याने त्यास खालीलप्रमाणे वारसांची नांवे दाखल केले.

| | | |
|---|---|---|
| 1.गेणू भिका मोरे | वय 40 | मुलगा |
| 2.शिवुबाई भ्र.वजेराम भावनाथ | वय 45 | मुलगी |
| 3.नकुबाई भ्र.शंकर पांगरे | वय 35 | मुलगी |
| 4.सखुबाई भ्र.लक्ष्मण ढेमसे | वय 43 | मुलगी |

वरीलप्रमाणे वारसांची नांवे दाखल केले वारस रजिष्टर प्रमाणे.

नोंद क्रमांक 829 दिनांक 01/11/1964 रोजी श्रीमती काशिबाई भ्र गोविंदा खांडबहाले हिने दिनांक 19/10/1964 रोजी अर्ज व जबाब दिला की, बाजूस दाखविलेल्या जमिनीस व खात्यास 1. नाना महादू मोरे 2. दत्तु महादू मोरे 3.काशिबाई भ्र.गोविंदा खांडबहाले असे सामाईक नांवे लागलेली आहेत परंतू मी महिरावणी ता.नासिक येथे राहत असून मी या गांवी राहत नाही व शेती,घर हे माझ्या ताब्यात नसून नाना व दत्तु महादू यांचेच कबजा वहिवाटीत आहे व शेतसारा तेच भरतात करीता माझे नांव खात्यास सामाईक लागलेले पोकळीस्त कमी करावे व 1. नाना महादू मोरे 2. दत्तु महादू मोरे यांचे दोघांचेच सामाईक नांवे कायम ठेवावे. माझे नांव कमी कावे असा अर्ज व जबाबावरून नोंद करून दाखला घेतला.

नोंद नंबर 833 दिनांक 05/06/65 अर्जावरून बाजूस दाखविलेल्या जमिनीचे सामाईक कबजेदार 1.शिवुबाई बजेराम भावनाथ 2. सखुबाई लक्ष्मण ढेमसे 3.नकुबाई भ्र शंकर पांगरे यांनी दिनांक 29/5/65 रोजी अर्ज दिला की, बाजूची जमिन ही आपआपसात भाऊ श्री.गेणू भिका मोरे यांचे कबजा वहिवाटीत असून तोच जमिनीचा शेतसाराही भरतो आमचे कबजात जमिन नाही म्हणून आमची तिघींची नांवे कमी करून

MUKUND R. ODHEKAR ADVOCATE Regd.No. MAH/1467/1990



श्री गेणू भिका मोरे यांचे एकटयाचेच जमिनीला नाव लागावे असा अर्ज व जबाबावरून दाखला घेतला.

नोंद क्रमांक 856 दिनांक 3/10/1965 रोजी गेणू भिका मोरे यांनी दिनांक 21/9/65 रोजी अर्ज दिला की, मौजे अंबड खुर्द यागांवी माझे नांवावर असलेल्या खात्यास व खात्यातील जमिनीस माझा चुलतभाऊ गंगाराम गोपाळा मोरे यांचे नांव 08 आणे हिश्याप्रमाणे लावावे असे बद्दलचा लेखी अर्ज व जबाब दिनांक 2/10/1965 रोजीचा दिलेवरून खात्यास व खात्यातील जमिनीला सामाईक नांवे दाखल केली आहेत. अर्ज व जबाबावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 972 दिनांक 7/11/69 रोजी महाराष्ट्र राज्याचा वजन मापन सबंधीचा कायदा महाराष्ट्र राज्याचा वजनमापा सबंधीचा कायदा [Enforcement Act ]1958 व भारतीय नाणी कायदा [Indian Coinage Act] अन्वये गांवचे हक्क नोंद कागदी अंमल देणेसाठी मे.वि.जि.नि.भुमी अभिलेख/दशमान ठाणे मुलूंड यांचेकडून परिणामात रूपांतर आकरबंद व हिस्सा फॉर्म नंबर 12 गांव वहिवाटीस आलेवरून त्याचा गांवी अंमल देणेसाठी नोंद केली असे.

नोंद क्रमांक 1047 दिनांक 19/2/72 रोजी अर्जावरून गेणू भिका मोरे व गंगाराम गोपाळा मोरे यांनी लेखी अर्जाने कळविले की, बाजूस दाखल केलेल्या जमिनीची भाऊ हिश्याप्रमाणे वाटप खालीलप्रमाणे करून घेतली आहे नोंद पुसट असल्यामुळे दिसून येत नाही.

नोंद क्रमांक 1056 दिनांक 27 डिसेंबर 1972 बाजूस दाखल केलेली जमिन नाना महादू मोरे यांनी बाजूस दाखल केलेली जमिन अंबड कामटवाडे वि.का.से.सह.सोसायटीस रूपये 10000/- डिक्लरेशन करून दिल्याने इतर हक्कांत बोजा दाखल केला अर्ज व प्रतिज्ञापत्रावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 1140 दिनांक 22/5/1978 रोजी कृष्णाजी नथूची धात्रक यांनी बाजूस दाखल केलेल्या जमिनीपैकी क्षेत्र 4 एकर 00 गुंठे आकार रूपये 5.85 पैसे क्षेत्र आकाराचे जमिनीची रक्कम रूपये 14000 दिनांक 19/4/73 रूपये घेण्याचे ठरवून जमिन नाना महादू मोरे, दत्तु महादू मोरे, गेणू

भिका मोरे, गंगाराम गोपाळा मोरे यांना साठेखतापोटी रूपये 7000/- दिनांक 16/4/73 रोजी दिलेने इतर हक्कांत रकमेचा बोजा दाखल केला अर्ज व साठेखतावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 1286 दिनांक 7/9/82 बोजा कमी बाजूस दिलेल्या गट नंबरचे इंडियन बॅक शाखा अंबड खुर्द यांचा रक्कम रूपये नोंद पुसट आहे. औद्योगिक कर्जाचा बोजा आहे सदर कबजेदार गंगाराम गोपाळा मोरे यांनी दिनांक दिसून येत नाही सदर बोजा कमी होणेबाबत सबंधी दिनांक 8/--/82 रोजी चे लेटर आलेवरून नोंद केली असे

नोंद क्रमांक 2148 दिनांक 22/2/94 अर्ज व हुकूमावरून बाजूस दाखल केलेल्या जमिनीचे गंगाराम गोपाळा मोरे यांचा अर्ज व नागरी जमिन कमाल धारणा नियम अधिनियम 1976 चे कलम 9/3 अन्वये सुधारित अंतिम विवरणपत्र क्रमांक /अ-2/2366 /10 दिनांक 28/1/94 प्रमाणे हिस्से खालीलप्रमाणे दाखल केले.

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र चौ.मी. | कबजेदार |
|---|---|---|---|
| 299/1 | | 29008.40 | गंगाराम गोपाळा मोरे |
| 299/2 | | 3950.00 | गंगाराम गोपाळा मोरे रिटेंशन |
| 299/3 | | 31241.60 | गंगाराम गोपाळा मोरे अतिरिक्त क्षेत्र |

वरीलप्रमाणे तिन हिस्से केले असून अर्ज व हुकूमावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 2149 दिनांक 28/3/94 खरेदीने बाजूस दाखल केलेला प्लॉट हा एकनाथ पुंडलीक शिंदे यांनी श्री निवृत्ती घमाजी फडोळ यांचे ज.मु. दिपक रामचंद्र बागड यांचेपासुन रक्कम रूपये 45940/- रूपयास दिनांक 17/3/94 रोजी कायम खरेदीने घेतला. सदरचा प्लॉट बिनशेती असून अर्बन सिलींगची परवानगी घेतली आहे. अर्ज व खरेदीखतावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 2515 दिनांक 27/5/1998 रोजी आदेशावरून बाजूस दाखल केलेल्या जमिनीबाबत मा. अप्पर

D.R. ODHE
100K



जिल्हाधिकारी साहेब ना.ज.क.म. अ-2/124/1998/दिनांक 7/9/98 अन्वये खालील प्रमाणे आदेश दिले आहेत सदर आदेशावरून अनुज्ञेय व अतिरिक्त व बिनमोकळे क्षेत्राचे 7/12 विभक्त केले असे.

| | | |
|---|---|---|
| 299/1/1 | 18,000/- | चौ.मी. अनुज्ञेय क्षेत्र गंगाराम गोपाळा मोरे |
| 299/1/2 | 5759/- | चौ.मी. अतिरिक्त क्षेत्र गंगाराम गोपाळा मोरे |
| 299/1/3 | 5249/- | चौ.मी. इतर हक्कातील बोजासह (1060/- वहिवाट रस्ता व बिनमोकळे क्षेत्र) |

वरीलप्रमाणे 7/12 उतारे विभक्त केले असून 299/1/2 या हिश्यात सर्व बोजे दाखल केले असे आदेशावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 2535 दिनांक 27/5/1999 रोजी आदेशावरून बाजूस दाखल केलेल्या जमिनीबाबत मा. अप्पर जिल्हाधिकारी साहेब ना.ज.क.म. अ-2/124/1998/दिनांक 7/9/98 अन्वये खालील प्रमाणे आदेश दिले आहेत सदर आदेशावरून अनुज्ञेय व अतिरिक्त व बिनमोकळे क्षेत्राचे 7/12 विभक्त केले असे.

| | | |
|---|---|---|
| 299/1/1 | 10,000/- | चौ.मी. अनुज्ञेय क्षेत्र |
| 299/1/2 | 5759/- | चौ.मी. अतिरिक्त क्षेत्र |
| 299/1/3 | 5249/- | चौ.मी. इतर हक्कातील बोजासह (1060/- वहिवाट रस्ता व बिनमोकळे क्षेत्र) |

वरीलप्रमाणे 7/12 उतारे विभक्त केले असून 299/1/3 या हिश्यात सर्व बोजे दाखल केले असे आदेशावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 2995 दिनांक 4/6/2000 आदेशावरून बाजूस दाखल केलेल्या जमिनीबाबत मा.अप्पर जिल्हाधिकारी ना.ज.क.म नासिक यांचेकडील आदेश क्रमांक ना.ज.क.म. /अ/2/2366/10 नासिक दिनांक 1/6/99 अन्वये आदेश दिले की, पुढीलप्रमाणे क्षेत्र विभक्त करणे.

गंगाराम गोपाळा मोरे

299/3/1 31241.60 6560 डि.पी.रोड

3969 पी.एस.साईड

6937.60 गार्डन रिझर्व

299/3/2 13775.00 गंगाराम गोपाळा मोरे

299/3/2 चे इतर हक्कात अतिरिक्त क्षेत्र दाखला घेतला असे.

नोंद क्रमांक 3001 दिनांक 10/7/2000 अभिन्यासावरून बाजूस दाखल केलेल्या सर्व्हे नंबरबाबत अभिन्यास दाखल झाला की, म. सहाय्यक संचालक नगररचना विभाग नासिक यांचेकडील पत्र क्रमांक नगरररचना विभाग / अंतिम/सीडी/ बी-1/62 दिनांक 25/1/2000 अन्वये व अप्पर तहसिलदार नासिक बिनशेती यांचे कडील पत्र क्रमांक बिनशेती एसआर/641/2000 दिनांक 8/8/2000 अन्वये बिनशेती आदेश दिल्याने खालीलप्रमाणे बिनशेती प्लॉट पाडले असे. गट नंबर 299/1/1 प्लॉट क्रमांक 1 ते 69 गंगाराम गोपाळा मोरे एकूण प्लॉट क्षेत्र 13205.62 चौ.मी.

299/1/1/ब 1800.00 ओपन स्पेस

299/1/1/क 125.00 एमएसइबी

299/1/1/ड 2869.38 रस्ते व कॉलनी रस्ते

एकूण क्षेत्र - 18000.00

वरीलप्रमाणे 7/12 विभक्त केले असे नोंद अभिन्यासावरून केली असे.

नोंद क्रमांक 4526 दिनांक 6/10/2006 रोजी खरेदीने सौ. मिना मोहन चौव्हाण यांनी बाजूस दाखल केलेली मिळकत 1. गंगाराम गोपाळा मोरे 2. विलास गंगाराम मोरे 3. रतन गंगाराम मोरे 4. रामभाऊ गंगाराम मोरे 5. शिवाजी गंगाराम मोरे 6. लक्ष्मीबाई गंगाराम मोरे 7. शुभद्रा काशिनाथ मटाले 8.नंदा सुकदेव भावले 9.शिला दत्तु निमसे 10. ठकू उत्तम सहाणे 11. सरला संजय गवळी अ.नं. 1 ते 11 यांचे ज.मु. विराज इस्टेटस् प्रा.लि. तर्फे चंद्रशेखर बाबुलाल शहा यांचेपासुन रक्कम रूपये 14,00,000/-दिनांक 28/6/2006 रोजी कायम खरेदी घेतली असें खरेदी घेणार शेतकरी

MUKUND R. ODHEKAR
Regd.No. MAH/1467/2000
ADVOCATE



असल्याबाबत मौजे पापळ ता. जाफ्राबाद जि. जालना येथील गट नंबर 189 पै क्षेत्र हे0.11 आर चा संगणीकरण 7/12 उतारा तहसिलदार कार्यालय जाफ्राबाद येथील हजर केलेला आहे. नोंद खरेदीखताची नक्कल, अर्ज व ज.मु. पत्रावरून केली असे तसेच ना.ज.क.म. नासिक यांचेकडील गट नंबर 299/3/1 गार्डनसाठी आरक्षित क्षेत्रास नाहरकत दाखला हजर केलेला आहे तरी मिळकतीचे इतर हक्कांत गट नंबर 299/3/1 क्षेत्र 17466.60 चौ.मी. एकूण क्षेत्रापैकी गार्डनसाठी आरक्षित क्षेत्र 6937.60 चौ.मी. असा दाखला घेतला आहे.

नोंद क्रमांक 4909 दिनांक 16/11/2007 खरेदीने नवलभाऊ प्रतिष्ठान तर्फे कार्याध्यक्ष श्री. अनिकेत विजय पाटील यांनी बाजूस दाखल केलेली मिळकत 1. गंगाराम गोपाळा मोरे 2. विलास गंगाराम मोरे 3. रतन गंगाराम मोरे 4. रामभाऊ गंगाराम मोरे 5. शिवाजी गंगाराम मोरे 6. लक्ष्मीबाई गंगाराम मोरे यांचेपासुन रक्कम रूपये 19,00,000/-एकोणाविस लाख रूपये मात्र दिनांक 17/10/2007 रोजी कायम खरेदी प्राथमिक शाळेसाठी आरक्षितसाठी घेतली असे तरी इतर हक्कात प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असा दाखला घेतला असे ना.ज.क.म. नासिक यांचेकडून हस्तांतरणास नाहरकत दाखला घेतला आहे. तसेच खरेदी घेणार शेतकरी असल्याबाबत मौजे अमळनेर ता.अमळनेर येथील सर्व्हे नंबर 122/1/ब क्षेत्र हे.8.00 आर जमिनीचा 7/12 उतारा हजर केलेला आहे नोंद अर्ज खरेदीखताची नक्कल यावरून केली असे.

नोंद क्रमांक 6010 दिनांक 17/5/2008 राजी करारनामा नासिक महानगरपालिका नासिक तर्फे म.सहाय्यक संचालक साहेब सुलेखा बबन वैजापूरकर यांनी बाजूस दाखल केलेली मिळकत 1. गंगाराम गोपाळा मोरे 2. विलास गंगाराम मोरे 3. रतन गंगाराम मोरे 4. रामभाऊ गंगाराम मोरे 5. शिवाजी गंगाराम मोरे 6. लक्ष्मीबाई गंगाराम मोरे 7. शुभद्रा काशिनाथ मटाले 8.नंदा सुकदेव भावले 9.शिला दत्तु निमसे 10. ठकू उत्तम सहाणे 11. सरला संजय गवळी अ.नं. 1 ते 11 यांचे ज.मु.म्हणून श्री. प्रसाद एकनाथ बागड यांचेपासुन

MUKE... SHEKAR ADVOCATE



डी.पी.रोड साठी आरक्षित असलेले क्षेत्र 6560.00 चौ.मी. सार्वजनिक वापरासाठी नासिक महानगरपालीका नासिक यांचे ताब्यात दिलेले असल्याने श्री.गंगाराम गोपाळा मोरे व इतर यांचे नांव कमी करून नासिक महानगरपालीका नासिक यांचे नांव दाखल केले असे नोंद अर्ज व नोंदणीकृत करारनामा यावरून नोंद केली असे.

उपरोक्त मिळकतीचा तयार करण्यात आलेला ले-आऊट प्लॅन मे.सहाय्यक संचालक नगररचना नासिक महानगरपालीका नासिक यांचे पत्र क्रमांक जा.न /नगररचना विभाग/ अंतिम/बी-2/11/2017 दिनांक 17/10/2017 अन्वये अंतिम मंजूर करण्यात आलेला असून मे.जिल्हाधिकारी साहेब नासिक यांचे आदेश क्रमांक मह/कक्ष-3/7-1/ना.ह.दा./एस.आर/27/2017 दिनांक 01/07/2017 अन्वये निवासी कारणासाठी बिनशेतीकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

नोंद क्रमांक 9818 दिनांक 8/1/14 खरेदीने बाजूस दाखल केलेली मिळकत स.नं. 299/3/1 यांसी एकूण क्षेत्र 17466.60 चौ.मी.यापैकी एकूण मिळकतीपैकी गार्डनसाठी आरक्षित दर्शविलेले क्षेत्र 6937.60 चौ.मी.ही मिळकत मिना मोहन चौहान यांनी 1. कन्हैय्यालाल चेतनदास मनवाणी 2. दिनेश कन्हैय्यालाल मनवानी 3.विनोद कन्हैय्यालाल मनवाणी यांना रक्कम रूपये 2,35,00,000/- रूपये-दोन कोटी पस्तीस लाख मात्र दिनांक 30/12/13 रोजी दुय्यम निबंधक नासिक-4 यांचेकडील दस्त क्रमांक 14474/13 ने नोंदवून खरेदीने दिलेली आहे सदरचे खरेदीखत दस्तावरून खरेदी घेणार यांचे नांव सदर मिळकतीत दाखल केले अर्ज झेरॉक्स खरेदीखतावरून नोंद केली असे.

नोंद क्रमांक 11531 -नोंदीचा प्रकार - आदेश व दस्ताऐवज फेरफाराचा दिनांक 24/4/2017 माहीती मिळालेचा दिनांक 6/4/2017 अधिकारी नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन आदेश क्रमांक - शासन निर्णय क्रमांक टीपीएस 1115/124 प्र.क्र.71/2015 /नवि-9 आदेश दिनांक 21/5/2017 बाजूस दाखल केलेली मिळकत मौजे अंबड खुर्द

MUKUND R. ODHEKAR



सर्व्हे नंबर 299/3/1 यांसी क्षेत्र 174.6660 चौ.मी. ही नवलभाऊ प्रतिष्ठान दिनेश कन्हैय्यालाल मनवाणी,विनोद कन्हैय्यालाल मनवाणी , कन्हैय्यालाल चेतनदास मनवाणी नाशिक महानगरपालिका यांचे नांवे दाखल असून सदर मिळकतीच्या इतर अधिकारात गार्डनकडे 693760 चौ.मी. इतके क्षेत्र असून सदर क्षेत्राबाबत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांच्या कडील आदेश क्रमांक शासन निर्णय क्रमांक टी.पी.एस. 1115/124/प्र.क्र.71/2015 /नवि-9 दिनांक 21/5/2015 अन्वये इतर अधिकारातील गार्डन कडील क्षेत्राचा शेरा कमी करणेबाबत झालेल्या आदेशावरून नोंद केली.

नोंद क्रमांक 12242- नोंदीचा प्रकार -खरेदी फेरफाराचा दिनांक 30/7/2018 माहिती मिळाल्याचा दिनांक 21/5/2018 लिहून देणार-दिनेश कन्हैय्यालाल मनवाणी, विनोद कन्हैय्यालाल मनवाणी,कन्हैय्यालाल चेतनदास मनवाणी खाता क्रमांक 4173 क्षेत्र 4900 चौ.मी. पैकी बिनशेती एनए क्षेत्र 4900.00 चौ.मी. यांचे गट क्रमांक 299/3/1 प्लॉट क्रमांक 01 हे लिहून घेणार - मे. शिवालिक रियल्टी भागीदारी संस्थेतर्फे भागीदार 1.मधुभाई बाबुभाई कोठीया 2. चंद्रिका मधुभाई कोठीया 3. कौशिक मधुभाई कोठीया 4. अशिष मधुभाई कोठीया 5. जगदिश बाबुभाई कोठीया 6. शिल्पाबेन जगदिश कोठीया 7. मोनिका जगदिश कोठीया 8. रूतिका जगदिश कोठीया 9. महेश प्रेमजीभाई कथिरिया 10. वजुभाई प्रेमजीभाई कथिरिया 11. रोहित मनुभाई कनानी 12. सुरेश बाबुभाई धनानी 13 दिव्येश नवलभाई धनानी 14. हसममुख भिखाभाई कानपरिया खाता क्रमांक 4535 बिनशेती एनए क्षेत्र 4900.00 चौ.मी. यांना सह दुय्यम निबंधक वर्ग-2 नासिक 7 यांचेकडील दस्त क्रमांक 1844/2018 दिनांक 05/4/2018 प्रमाणे रक्कम रूपये 6,93,00,000/-रूपये सहा कोटी त्र्यान्नव लाख मात्र घेवून खरेदी दिलेने अर्ज व खरेदीखाताची नक्कलेवरून खरेदी घेणार यांचे नांवे दाखल केले.

ॲडव्होकेट मुकूंद आर ओढेकर यांनी सर्च मे.सह दुय्यम निबंधक साहेब वर्ग-2 नासिक यांचे कार्यालयातून 30 वर्षाचे

सर्च पावती क्रमांक---------दिनांक 01/11/2018 अन्वये घेतला आहे.

शिवालिक रिअल्टी तर्फे भागीदार मधुभाई बाबुभाई कोठीया व इतर यांनी त्यांचे लाभातील खरेदीखतानुसार बांधकाम परवानगी मिळणेकामी नाशिक महानगरपालीका नाशिक कार्यकारी अभियंता यांनी निवासी व वाणिज्य बांधकाम परवानगी क्रमांक एलएनडी /बीपी/सीडी/704 दिनांक 19/10/2019 रोजी परवानगी मिळविली आहे.

वरील प्रमाणे मौजे अंबड खुर्द गट नंबर 299/3/1 पैकी प्लॉट नंबर क्रमांक 01 यांसी एकूण क्षेत्र 4900.00 चौ.मी. ही भुखंडाची मिळकत निर्वेध व बिनबोजाची असून सदर मिळकतींचे टायटल स्वच्छ व निर्दोष आहे.कळावे

Adv

*मुकूंद रामचंद्र ओढेकर*

*ॲडव्होकेट*

**Adv.Mukund Ramchandra Odhekar**
B.Com. LL.B
Shivdurga Bungalow, S.No.575,
Plot No.3, Dr. Bhabha Nagar, Nasik.
Mobile :- 93256 68069